जीवन किती वर्ष जगलात याला महत्व नाही, जीवन कसे जगलात याला महत्त्व आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ७ मार्च २०२५ | अंक ८८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# पोलिसांची भीती संपली? महाराष्ट्रात आणखी एका सरपंचावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला

## का झाला हल्ला?

हॉटेलमध्ये थुंकण्यावरून हा वाद झाला आहे. सरपंच निलेश देशमुख आणि त्यांचे मित्र हे बारमध्ये जेवायला बसलेले होते तर आरोपी सुद्धा बाजूच्या केबिबमध्ये जेवायला बसलेले होते. दोन्ही गटात यावेळी थुंकण्याच्या कारणावरून वाद झाला आणि त्याचे रूपांतर मारामारीत झाले. या शुल्लक कारणामुळे सरपंच निलेश देशमुख यांना रस्त्यात अडवून त्यांच्यावर हा जीव घेणा हल्ला करण्यात आला आहे.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणावरुन राज्यात संतप्त प्रतिक्रिया अजूनही सुरु आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आक्रोश व्यक्त होत आहे. आरोपींना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी आंदोलने होत आहे. त्याचवेळी पुन्हा एका सरपंचावर जीवघेणा हल्ला झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सुटाळा ग्रामपंचायतच्या सरपंचावर लोखंडी रॉडने हल्ला जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात सरपंच निलेश देशमुख गंभीर जखमी झाले आहे. किरकोळ कारणावरुन हा हल्ला झाल्यामुळे राज्यात गुन्हेगारांना पोलिसांची भीती राहिली नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

काय घडला प्रकार

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात एका सरपंचावर जीवघेणा हल्ला झाल्याचा



धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खामगाव तालुक्यातील सुटाळा बुद्रुक येथील सरपंच निलेश देशमुख यांच्यावर लोखंडी रॉडने हा हल्ला करण्यात आला आहे. या घटनेत निलेश



देशमुख गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आला आहे.

का झाला हल्ला?

हॉटेलमध्ये थुंकण्यावरून हा वाद झाला आहे. सरपंच निलेश देशमुख आणि त्यांचे मित्र हे बारमध्ये जेवायला बसलेले होते तर आरोपी सुद्धा बाजूच्या केबिबमध्ये जेवायला बसलेले होते. दोन्ही गटात यावेळी थुंकण्याच्या कारणावरून वाद झाला आणि त्याचे रूपांतर मारामारीत झाले. या शुल्लक कारणामुळे सरपंच निलेश देशमुख यांना रस्त्यात अडवून त्यांच्यावर हा जीव घेणा हल्ला करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन्ही गटातील परस्पर विरोधी तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. सरपंच देशमुख यांच्या तक्रारीवरून तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी सुद्धा आपणास सरपंचसह तिघांनी मारहाण केल्याचा आरोप करत तक्रार दिली आहे. त्यावरुन गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, राज्यात गुन्हेगारांकडून हल्ले करण्याचे प्रकार वाढत आहे. त्यामुळे पोलिसांचा धाक राहिला नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

# धनंजय मुंडेंनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजा मुंडे भेटीला, कारण गुलदस्त्यात

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्यातच मंत्री धनंजय मुंडे यांना त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी सीआयडीने आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रातून अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. संतोष देशमुख यांची हत्या करताना, त्यांना क्रूरपणे मारहाण करतानाचे अनेक व्हिडीओ, फोटो समोर आले. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली. या हत्येच्या कटात सहभागी असलेले विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, कृष्णा आंधळे हे सर्वजण या फोटोत पाहायला मिळत आहे. संतोष देशमुखांची निर्घृण हत्या करतानाचे फोटो आणि व्हिडीओ समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. धनंजय मुंडे यांनी वैद्यकीय कारणात्सव राजीनामा दिल्याचे सांगितले. यानंतर आता धनंजय मुंडेंच्या भगिनी आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडेंची भेट घेतली.मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर पहिल्यांदाच भेट मिळालेल्या माहितीनुसार, पंकजा मुंडे या नुकत्याचधनंजय मुंडे यांचे निवासस्थान असलेल्या सातपुडा बंगल्यावर पोहोचल्या. रात्री ९ च्या आसपास त्या त्यांच्या कारने धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर पोहोचल्या. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांची ही पहिलीच भेट आहे. त्यामुळे या भेटीकडे सर्वांचेच लक्ष लागलं आहे. गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे हे आजारी आहेत. धनंजय मुंडे यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया नुकतीच पार पडली. यानंतर त्यांना डॉक्टरने विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यातच त्यांना बेल्स पाल्सी नावाचा दुर्मिळ आजार झाला. त्यांच्यावर रिलायन्स रुग्णालयात उपचार सुरु होते. या आजारामुळे त्यांना सलग दोन मिनिटेही व्यवस्थित बोलताही येत नव्हते. त्यांनी स्वतः ट्वीट करत याबद्दलची माहिती दिली होती. यानंतर आता पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली. धनंजय मुंडे



यांची प्रकृती बरी नसल्याने भेट घेतल्याचे बोललं जात आहे. धनंजय मुंडेंचा मंत्रिपदाचा राजीनामा धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर ट्वीट करत प्रतिक्रिया दिली होती. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसदब विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहेङ्क, असे ट्वीट धनंजय मुंडेंनी केले होते.

# अखेर सतीश भोसलेवर धनंजय कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल


शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून सतीश भोसलेविरोधात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर तालुक्यातील एका व्यक्तीला अमानुषपणे बॅटच्या साह्याने बेदम मारहाण करण्यात आली याचा व्हिडिओ सोशल माध्यमांवरती व्हायरल झाला. यानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्रभर संतापाची लाट पाहायला मिळाली. बॅटच्या साह्याने मारहाण करणारा व्यक्ती भाजपाचा पदाधिकारी सतीश भोसले असून त्याच्यावरती आता पोलीस ठाण्यामध्ये ३२४, ३२३, ५०६, ३४ प्रमाणे, स्वतः पोलीसांनी फिर्यादी होऊन सुमोटो नुसार खटला दाखल केला आहे. फिर्यादी पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून रात्री उशिरा अकराच्या दरम्यान हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, भाजप पदाधिकारी सतीश भोसले याचा शिरूर पोलीस शोध घेत आहेत. काही दिवसांपूर्वी संतोष देशमुखांची अमानुषपणे हत्या केल्याचे फोटो प्रसारमाध्यांवर प्रसारित झाले होते. हे फोटो पाहून राज्यभर संतापाची लाट तर उसळलीच पण, मन हेलावून टाकणाऱ्या फोटोंमुळे हळहळही व्यक्त केली गेली. या गोष्टीला काहीच दिवस होत नाहीत तोवर, बीडमधील शिरूर परिसरात एका व्यक्तीला बॅटच्या साह्याने बेदम मारहाण करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. मारहाणीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनेची माहिती घेतली असून, तपासात मारहाण करणारी व्यक्ती सतीश भोसले असल्याचे निष्पन्न झाले आहे. घटनास्थळ अद्याप निश्चित झालेले नसले तरी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# -सद्भावना पदयात्रेत सहभागी व्हा - संभाजी जाधव

प्रतिनिधी बीड

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात, बीड जिल्ह्यातील विविध जाती आणि धर्मातील बंधु भगिनींनी सहभाग घेण्यासाठी ८ आणि ९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा आयोजित करण्यात येत आहे. या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव यांनी केले आहे.

८ मार्च रोजी सकाळी स्व. संतोष देशमुख यांना अभिवादन करून या पदयात्रेची सुरुवात होईल. यानंतर नांदुरफाटा आणि येळंबफाटा मार्गे नेकनुर येथे मुक्कामी होण्यात येईल. दुसऱ्या दिवशी, म्हणजे ९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामी संस्थान येथून ही पदयात्रा सुरू होईल. यामध्ये मांजरसुंभा, पाली मार्गे बार्शीनाका, आणि मोमीनपुरा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून सुभाष रोड, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येईल. या पदयात्रेचा समारोप यशवंतराव चव्हाण



नाट्यगृह बीड येथे होणार आहे. या सद्भावना पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अ. भा. काँग्रेसच्या सचिव खासदार रजनी पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह बीड जिल्ह्यातील व शहरातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत.जिल्ह्यातील सर्व जाती व धर्मातील लोकांना योगदान देण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव यांनी केले आहे.

# परळीत कॅन्डल मार्चने देशमुख, मुंडे,सूर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण

परळी (वार्ताहर)

मसाजोगचे सरपंच कै संतोष अण्णा देशमुख, परळीचे कै महादेव मुंडे, परभणीचे कै सोमनाथ सूर्यवंशी यांना परळी वैद्यनाथ येथे सकल मराठा समाजाच्या वतीने कॅण्डल मार्च काढून सामूहिक श्रद्धांजली देण्यात आली. परळी वैद्यनाथ येथील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान येथून जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करून कॅन्डल



मार्चला सुरुवात झाली. पुढे राणी लक्ष्मी टावर, मोंढा मार्केट, स्टेशन रोड, एकमिनार चौक, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक असा कॅन्डमार्च काढण्यात आला व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सामूहिक श्रद्धांजली देण्यात आली. या कॅन्डल मार्चमध्ये व सामूहिक श्रद्धांजली देण्यासाठी परळीतील सर्वपक्षीय सर्व जाती धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात या प्रकरणातील आरोपींना तात्काळ कठोरात कठोर शिक्षा म्हणजे फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच या प्रसंगी परळीतील जनतेने भयमुक्त जीवन जगून येणाऱ्या काळामध्ये लोकशाही नांदण्यासाठी सर्वांनी एकोप्याने अन्याय अत्याचाराचा मुकाबला करण्याचे आव्हान सुद्धा करण्यात आले असून या कॅन्डल मार्च व सामूह सामूहिक श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्रिपदासाठी रस्सीखेच ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांच्यासह सतीश चव्हाण यांनी आपली वर्णी लागावी, यासाठी पाऊले



## मराठवाड्यालाच मिळू शकते मंत्रिपद?

नव्याने राष्ट्रवादीमधून निवडून आलेले लोह्याचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनाही संधी मिळू शकेल, असा दावा केला जात आहे. रिक्त जागा भरताना मराठवाड्यातून वजा झालेले मंत्री पद याच भागात राहावे, यासाठी नेत्यांनी प्रयत्न करायला सुरुवात केली. त्यामुळे एका रिक्त पदावर खूप जणांचा दावा असू शकतो. तशा पडद्यामागच्या हालचालींना सुरुवात झाली आहे. यातील काही इच्छुकांनी अजित पवार यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे.

छ. संभाजीनगर | प्रतिनिधी मस्साजोगचे दिवंगत माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील निघृ णतेची छायाचित्रे समोर आल्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. यामुळे एकाच जिल्ह्यातील दोन मंत्री पदे देण्याचा असमतोल दूर करण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे असल्याची चर्चा सुरू झाली. ङ्गराष्ट्रवादीफच्या वाट्यातील मराठवाड्याच्या रिक्त झालेल्या जागेवर प्रताप पाटील चिखलीकर, माजी मंत्री संजय बनसोडे, ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांच्यासह विधान परिषदेतील आमदार सतीश चव्हाण यांनी आपली वर्णी लागावी, यासाठी पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. दरम्यान कारवाईनंतरचा धुराळा शांत होईपर्यंत हे खाते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच राहिल, असे सांगण्यात येत आहे. धनंजय मु ंडे पालकमंत्री असताना बीडच्या प्रशासकीय यंत्रणामध्ये आरोपी वाल्मिक कराड याचा शब्दच अंतिम मानला जात असे. कराड यास अटक झाल्यानंतर मु ंडे यांच्या कार्यशैलीवर सातत्याने प्रश्नचिन्ह उभे केले जात होते. परळीमधील औष्णिक वीज केंद्रातून होणारा अवैध व्यवहार, पीक विमा घोटाळा, हार्वेस्टरचा घोटाळा असे अनेक आरोप करण्यात आले. जिल्हा वार्षिक आराखड्यात निधीचे असमान वाटप यावरुन तर विधिमंडळाच्या सभागृहात धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करण्यात आले. यामध्ये सुरेश धस यांच्याबरोबर प्रकाश सोळंके यांचाही हात होता. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर मु ंडे यांच्या कार्यशैलीवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह अद्याप कायम आहे. मात्र, त्यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादीमधील राजकीय हालचालींना वेग आला आहे. माजी क्रीडामंत्री संजय बनसोडे अजित पवार यांच्या जवळचे मानले जातात. भाजपमधील नेत्यांशीही त्यांचे चांगले संबंध आहेत. केवळ निवडणुकीपुरते शरद पवार गटात गेलेले सतीश चव्हाण यांनी पुन्हा एकदा अजित पवार यांचे नेतृत्व स्वीकारले आहे. धाराशिवसह मराठवाड्यातील विस्तारासाठी पदवीधर मतदारसंघातील चव्हाण उपयोगी पडू शकतात, असा दावा केला जात आहे. माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके हेही राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते असल्याने त्यांचाही या पदासाठी दावा असू शकतो, या वेळी ते सलग तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

## संपादकीय

### अखेर..अखेर.. अखेर!

काही शब्दांना मोठे महत्त्व असते, त्याला एक प्रकारचे वजन असते. अखेर या शब्दाचेही तसेच आहे, पण असा प्रश्न पडतो की हा सन्माननीय अखेर शब्द ङ्गआधीचफ का येत नाही. सारे काही होऊन गेल्यावर, पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यावर गदारोळ माजल्यानंतर सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून हे ङ्गअखेरफ महाराज येतात. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की कंपनी खंडणी प्रकरणावरून राजीनाम्याची मागणी होत असलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर मंगळवारी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. आपल्या दोन सहाय्यकांमार्फत त्यांनी तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला. मुख्यमंत्र्यांनी राजीनामा शिफारशीसह राज्यपालांकडे पाठवल्यानंतर त्यांनी तो स्वीकारल्याचे संध्याकाळी जाहीर करण्यात आले. सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी गेल्या तीन महिन्यांपासून करण्यात येत होती. तेव्हा अजित पवारांनी मु ंडे यांना पाठीशी घातले होते. चौकशीत त्यांचे नाव कुठे, असा सवाल करीत त्यांना अभय दिले होते. मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी अजित पवारांनी फेटाळली होती. तसेच मुंडे यांना पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत सामील करून घेत त्यांचे महत्त्व अधोरेखित केले होते. राजीनामा देण्यासाठी मु ंडे दोषी कुठे आहेत, असा सवाल राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून केला जात होता. पण ङ्गअखेरफ मंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. पण तो देताना म्हटले की, माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. त्यामुळे वैद्यकीय कारणास्तवसुद्धा मी माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना विरोधकांनी राजीनाम्याची मागणी लावून धरल्याने धनंजय मुंडेंवर राजीनामा देण्याची पाळी आली असली तरी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मात्र सध्या सुपात आहेत. नैतिकतेच्या मुद्यावरून राजीनामा देणारे माजी केंद्रीय रेल्वेमंत्री आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्री सोडले तर आजच्या जमान्यात राजीनामा देणारे कोणी सापडणारच नाहीत. नैतिकतेच्या मुद्यावरून राजीनामा हा आज अत्यंत दुर्मिळ प्रकार बनला आहे. विरोधकांकडून मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असली तरी याच विरोधकांनी सत्तेत असताना नवाब मलिकांना ईडीने अटक केल्यानंतरही त्यांचा राजीनामा घेतलेला नव्हता. सध्या सत्तेत असलेल्या पण तेव्हा विरोधक असलेल्यांनी नवाब मलिकांच्या राजीनाम्यासाठी आकाश-पाताळ एक केले होते. म्हणजेच नैतिकतेच्या मुद्यावरून राजीनामा देणे हा प्रकारच दुर्मिळ होत चाललाय! अलिकडे काही राजकीय नेते साळसूदपणाचा आव आणून आपल्या बुद्धीचे प्रदर्शन करताना दिसतात. राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी नैतिकतेच्या मुद्यावर राजीनामा दिला होता असे हास्यास्पद विधान करतात. मग नैतिकता कृषिमंत्री कोकाटेंना लागू नाही का? ज्यांनी राजीनामा दिला ते तब्येतीचे कारण सांगतात मग विश्वास कोणावर ठेवायचा? नैतिकता जोपासायची असेल तर धनंजय मु ंडे यांनी राजकीय संन्यास घेऊन राजकारणात चांगला पायंडा पाडावा मग अजित पवार आणि सुनील तटकरे नैतिकतेच्या मुद्यावर साळसूदपणे बोलू शकतील आणि त्यांच्या कोडगेपणाला जनता माफ करेल! धनंजय मु ंडे यांचा निकटवर्तीय म्हणून ओळखला जाणारा वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख हत्याकांडाचा सूत्रधार असल्याचे सीआयडीने सादर केलेल्या दोषारोप पत्रात स्पष्ट झाले आहे. देशमुख कुटु ंबाच्या संघर्षानंतर आणि समाजमाध्यमाच्या रेट्यामुळे अखेर धनंजय मु ंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. हत्या प्रकरणाला ८० दिवस झाल्यानंतर मु ंडे यांनी राजीनामा दिला. हा राजीनामा नैतिकतेच्या आधारावर दिला असे कसे म्हणता येईल? संतोष देशमुखांना निंघृ ृणपणे जी मारहाण झाली ते फोटो पाहून मन अत्यंत व्यथित झाले असे मु ंडे म्हणतात. इतके दिवस त्यांच्या डोळ्यावर झापडे होती का? देशमुख कुटुंबाच्या आर्त किंकाळ्या त्यांना ऐकू येत नव्हत्या का? हा अस्सल कोडगेपणाच म्हणावा लागेल. पूर्वीच्या जमान्यात आपल्या खात्यात काही अघटित घडले की, त्याची जबाबदारी स्वीकारून मंत्रिपदाचा राजीनामा दिला जात असे. आज मंत्रिमहोदयांकडे राजीनामा मागावा लागतो, आकांडतांडव करावा लागतो. तरीसुद्धा गेंड्याच्या कातडीचे मंत्री हू ं की चू ं करत नाहीत! मग पूर्वीचे मंत्री बरोबर होते की आताचे? यामागची गोम अशी की, मिळालेली सत्ता सहजासहजी सोडावी वाटत नाही अथवा सोडता येत नाही. कारण गेलेली किंवा सोडलेली सत्ता परत कधी मिळेल ते सांगता येत नाही. तेव्हा मिळालेल्या सत्तेला घोरपडीसारखे चिकटून राहा हा मंत्र आजचे मंत्री जपताना दिसतात. निःस्पृह मंत्र्यांचा जमाना इतिहासजमा झाला आहे, लोकप्रतिनिधीच्या गोंडस नावाखाली स्वतःचे खिसे भरणे सुरू आहे. अनेक राजकारणी मंडळींना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी पोलिस आहेत. काही नेत्यांना तर तडीपारचा शिक्का बसलेला आहे तरीही ते राजकारणी आहेत. किरकोळ कारणासाठी गुन्हा नोंद झालेले राजकारणी आपण समजू शकतो. पण जेव्हा कायद्याचे रक्षण करणारे पोलिस अधिकारी अशा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या राजकारण्यांच्या संरक्षणासाठी काम करत असतात अर्थात नोकरी म्हणून त्यांना तसे करावे लागते, तेव्हा प्रश्न पडतो की, कायद्याचे रक्षण करणारे पोलिस अधिकारी अथवा पोलिस मोठे की, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे राजकारणी मोठे? कोडगेपणाचा कहर करणारे

# महीला सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलासाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे.देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढ-्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलामब-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा ङ्गमहीलांपासुनचङ्गसर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना ङ्गसंस्कृतीचाङ्गपाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे.म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर,अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या, आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही.



महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने ङ्गफास्ट ट्रॅकङ्गकोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. ङ्गमहीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीतङ्ग तेव्हाच ख-याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये ङ्गतारीख पे तारीखङ्गअसा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा ङ्गसंकल्पङ्गकेला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच ख-याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात ङ्गबेटी बचाव बेटी पढावङ्ग. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे.आज रशिया-युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.

------------

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार.
(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

# गावाकडची माणसंः साधेपणात सौंदर्य आणि माणुसकीचा स्पर्श! डॉ. भारत कऱ्हाड

गावाकडची माणसं म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात राहणारी, श्रमांना प्रतिष्ठा देणारी आणि माणुसकी जपणारी लोकं. त्यांचं जीवन शहरांपेक्षा वेगळं, पण तरीही आत्मसंतोषाने भरलेलं असतं. साधेपणा, आपुलकी, आणि परस्पर साहाय्य ही त्यांची जीवनशैली असते. जरी गावाकडच्या लोकांना अनेक समस्या भेडसावत असल्या, तरी त्यांच्या जगण्याची सहजता आणि त्यांचं निसर्गाशी असलेलं नातं हेच त्यांचं खरं वैशिष्ट्य आहे.

१. निसर्गाशी नातंः गावाचं आयुष्य आणि पर्यावरण

गावातील लोकांचं जीवन निसर्गावर अवलंबून असतं. शेतकरी हवामानाच्या चक्राशी निगडित असतो. त्याच्या पेरणीपासून ते कापणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर निसर्ग महत्त्वाची भूमिका बजावतो. पाऊस वेळेवर पडला तर समृद्धी, पण दुष्काळ पडला तर संपूर्ण गाव अडचणीत येतो. गावकऱ्यांच्या जीवनशैलीत पहाटे सूर्य उगवण्याआधीच कामाला सुरुवात होते. गावातल्या अनेक लोकांना निसर्गाचे नियम नैसर्गिकरित्या कळतात. बदलत्या वाऱ्यांच्या दिशेवरून पाऊस येईल का नाही, हे सांगण्याची त्यांची अनोखी दृष्टी असते.

गावातील बऱ्याच लोकांचे जीवन जंगलावर आणि नद्यांवर अवलंबून असते. कोळी समुद्रात मासेमारी करतात, गुराखी जंगलात आपली जनावरं चरण्यासाठी नेतात, आणि पारंपरिक औषधांमध्ये निपुण असलेले काही लोक वनस्पतींवर अवलंबून असतात. गावात जलस्रोतांवर विशेष लक्ष दिलं जातं. विहिरी, तळी, ओढे यांची नियमित स्वच्छता आणि देखभाल गावकरी एकत्र येऊन करतात.

२. श्रमाला प्रतिष्ठाः मेहनतीचं महत्त्व

गावातील लोकांना श्रमांची लाज वाटत नाही. शहरात जिथे ऑफिसमध्ये बसून केलेलं काम प्रतिष्ठेचं मानलं जातं, तिथे गावात राबराब राबणाऱ्या शेतकऱ्याचीही तितकीच किंमत असते. प्रत्येक कामाला महत्त्व असतं, मग ते शेतात राबणं असो, गुरे राखणं असो किंवा घरगुती कामं असो. महिला आणि पुरुष दोघंही मेहनत करत जगतात. महिलांचं काम केवळ स्वयंपाकघरापुरतं मर्यादित नसून त्या शेतात, दळण-वाटणात, घराची स्वच्छता, मुलांचं संगोपन, आणि समाजकार्य यातही महत्त्वाची भूमिका बजावतात.

गावातील हातमजुरी करणारे कारागीर, सुतार, लोहार, कुंभार, गवंडी हे आपापल्या कलेमध्ये निपुण असतात. त्यांची कला कोणत्याही मशीनपेक्षा सरस असते, कारण त्यामध्ये हृदयाचा आणि अनुभवाचा स्पर्श असतो.

३. माणुसकी आणि परस्पर साहाय्यः एक गाव, एक कुटुंब

गावातील माणसं परस्परांशी जोडलेली असतात. शहरांमध्ये जिथे लोक आपल्या घरात बंद राहतात, तिथे गावामध्ये प्रत्येकजण एकमेकांच्या मदतीसाठी तत्पर असतो. कोणाचं घर बांधायचं असो, लग्नकार्य असो, शेतीची कामं असो - सगळे मिळून मदतीला येतात. संकटसमयी गाव एकत्र येतं आणि कोणत्याही समस्येला तोंड देण्यास तयार राहतं. सण-उत्सवांमध्ये गावाची खरी रंगत दिसते. दिवाळी, होळी, बैलपोळा, दसरा, गणपती यासारख्या सणांमध्ये गावातील सर्वजण एकत्र येऊन आनंद साजरा करतात. यात्रांचे आणि जत्रांचे



वेगळेच महत्त्व असते. मंदिराच्या यात्रेत संपूर्ण गाव सहभागी होतो, पारंपरिक खेळ खेळले जातात, लोकनाट्य आणि तमाशासारखे कार्यक्रम सादर होतात.

गावात वडीलधाऱ्यांचा आदर हा संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. वृद्ध व्यक्तींच्या अनुभवाला विशेष महत्त्व दिलं जातं. त्यांचे सल्ले ऐकले जातात आणि त्यांचं स्थान घरात महत्त्वाचं असतं.

४. गावातील जीवनशैलीः समाधान आणि स्वावलंबन

गावातील लोकांची जीवनशैली शहरांपेक्षा वेगळी असते. जरी तिथे आधुनिक सोयीसुविधा कमी असल्या, तरीही त्यांचा जीवनाचा आनंद जास्त असतो. त्यांच्या गरजा मर्यादित असतात आणि ते त्यात समाधानी राहतात. अन्न शेतातून ताजं मिळतं, दूध गावातल्याच गायींचं असतं, आणि फळं-भाजीपाला नैसर्गिकरित्या उगवलेले असतात.

गावकऱ्यांच्या जगण्यात नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर दिसून येतो. ते स्वतःचं अन्न स्वतः पिकवतात, गाई-वासरांची काळजी घेतात, लाकडाच्या सहाय्याने स्वयंपाक करतात, आणि शक्य तिथे घरगुती उपाय वापरतात.

५. अडचणी आणि आव्हानंः गावातील संघर्षगावातील जीवन फक्त आनंददायीच नाही, तर काही कठीण अडचणीही त्यांच्यासमोर असतात. पाणीटंचाई ही एक मोठी समस्या असते. उन्हाळ्यात बऱ्याच गावांमध्ये पिण्यासाठी पुरेसं पाणी उपलब्ध नसतं. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होतं आणि स्थलांतर करावं लागतं.

शिक्षणाच्या संधी शहरांइतक्या उपलब्ध नसतात. अनेक गावांमध्ये चांगली शाळा नसते, आणि उच्च शिक्षणासाठी मुलांना शहरात जावं लागतं. आरोग्यसेवेचीही मोठी कमतरता असते. मोठ्या आजारांसाठी रुग्णांना शहरात न्यावं लागतं, कारण गावात मोठ्या रुग्णालयांची व्यवस्था नसते.

विजेचा अनियमित पुरवठा, दळणवळणाची अपुरी साधनं, आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे अनेक तरुण शहरांकडे स्थलांतर करतात. गाव सोडून शहरात गेलेल्या तरुणांना तिथे स्थिरस्थावर होणं अवघड जातं, पण गावातही त्यांना संधी मर्यादित असल्याने ते दुहेरी संकटात सापडतात.

६. गावाचे भविष्यः बदलत्या काळातील गावं

तंत्रज्ञानाच्या विकासामुळे गावांचं स्वरूप हळूहळू बदलत आहे. अनेक गावांमध्ये इंटरनेट पोहोचल्याने लोकांना नवीन संधी उपलब्ध होत आहेत. डिजिटल व्यवहार, ऑनलाइन शिक्षण, आणि कृषी तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना मदत मिळू लागली आहे.

सरकारच्या विविध योजना आणि नवीन तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागाचा विकास वेगाने होत आहे. शेतीत यांत्रिकीकरण वाढत आहे, नवीन सिंचन प्रकल्प येत आहेत, आणि शेतमालाची विक्री ऑनलाईन करता येऊ लागली आहे. त्यामुळे गावं आता हळूहळू प्रगत होत आहेत.

एकुणच, गावाकडची माणसं म्हणजे भारतीय संस्कृतीचा खरा आत्मा आहेत. त्यांचं निसर्गाशी असलेलं नातं, श्रमांना दिलेली प्रतिष्ठा, एकमेकांशी असलेली आपुलकी, आणि स्वावलंबी जीवनशैली हीच त्यांची खरी ओळख आहे. जरी गावात काही समस्या असल्या, तरी त्यांच्या जिद्दीने ते त्या सोडवण्याचा प्रयत्न करत असतात. आधुनिक तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांच्या सहाय्याने गावांचं जीवनमान सुधारत असलं, तरीही त्यांची पारंपरिक मूल्यं आणि साधेपणा जपणं हे तितकंच महत्त्वाचं आहे. शहरांमध्ये गोंधळ आणि धावपळीत अडकलेल्या लोकांनीही कधीतरी गावाकडे जाऊन या निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांकडून समाधानाने जगण्याचा खरा अर्थ शिकायला हवा.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य
वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# अंजनवती पोष्टमास्तरने भाऊसाहेब शेटेने केला ५० लाखांचा घोटाळा

## बनावट पासबुक द्वारे अपहार चौसाळा उपडाकघरात पैसे जमा केलेच नाहीत ; अंजनवती ग्रामस्थ संतप्त :- डॉ.गणेश ढवळे

अंजनवती :-( दि.०६ ) बीड तालुक्यातील अंजनवती गावातील पोष्ट मास्तर भाऊसाहेब शिवलिंग शेटे यांनी बनावट पासबुक तयार करून चौसाळा उप डाकघरातील कार्यालयात पैसे जमा न करता जवळपास ५० लाख रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप अंजनवती आणि घारगाव येथील ग्रामस्थांनी केला असुन यामध्ये रॅकेट कार्यरत असुन चौसाळा डाकघरातील अधिकारी कर्मचा-यांसह सर्वांचीच सखोल चौकशी करून गोरगरिबांच्या खात्यावरील पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे,रेवण येडे, वैभव येडे, सुधीर सोनवणे, महादेव माळी,बाळु शिंदे,मारोती वारकरी, बन्सी शिंदे आदींनी केली आहे.

मेंढ्या राखुन जमा केलेले दीड लाख रुपये गायब :- अनुसया कोंडीबा कर्डीले

---

मालक वारल्यानंतर , मेंढ्या सांभाळणं होईना मग त्या विकुन दीड लाख रुपये पोस्टात टाकले. बटईने दिलेल्या जमिनीतुन मिळणा-या पैशातून पोटापाण्याचं भागतं. काल गावात कालवा झाला तेव्हा कळलं पोष्ट मास्तरनं घोटाळा केलाय.आता आम्ही काय करावं असा प्रश्न ७५ वर्षीय अनुसया कोंडिबा कर्डुले हताश होऊन विचारताहेत.अशाच प्रकारे फसवणूक झाल्याचे पपिता प्रभाकर थोरात, मुक्ताबाई श्यामराव सोनावणे यांनी सांगितले.

चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांची सखोल चौकशी करून खातेदारानचे पैसे परत करा :- कैलास येडे सरपंच अंजनवती

---

केंद्र शासनाची योजना असल्याने याची विश्वासाहर्ता होती म्हणून गोर गरीब शेतमजुर यांनी पोष्टात पैसे जमा केले.२



वर्षांपूर्वी भाऊसाहेब शेटे पोष्ट मास्तर म्हणुन आल्यावर गोंधळ सुरू झाला. एका माणसाचे काम नसुन चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांचा सुद्धा यामध्ये सहभाग असल्याचा संशय असुन सखोल चौकशी करून कारवाई करावी आणि खातेदारांचे पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे यांनी केली आहे.

खातेदारांनी पुरावे द्यावे ;चौकशी करून कारवाई करू :- जाकोरे निरीक्षक डाकघर चौसाळा

---

# मुख्यमंत्री पन्हाळ्यावर जाण्यापूर्वी मोठा अनर्थ टळला, नेमकं काय घडलं?



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज पन्हाळा गडावर १३ऊ थिएटरच्या उद्घाटन होणार आहे. मात्र त्यापूर्वी एक मोठी घटना घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमस्थळी पोहोण्यापूर्वी तिथे साप आढळला. यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. मात्र सुदैवाने एका सर्पमित्राच्या सहाय्याने या सापाला पकडण्यात यश आले. हा साप वन विभागातील अधिका-यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. नेमकं काय घडलं? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज कोल्हापूर दौ-्यावर होते. यावेळी पन्हाळा गडावरील ङ्ग१३ डी थिएटरफ्चे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यासोबतच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवेंद्र फडणवीस हे संध्याकाळी ५ वाजता कोल्हापूर विमानतळावर दाखल झाले. यानंतर त्यांच्या हस्ते विन्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर संध्याकाळी साडेसहा वाजता श्रीक्षेत्र पैजारवाडी येथील शिक्षणमहर्षी पांडुरंग हिरवे गुरुजी व शिक्षणवृती भार्गव देशपांडे गुरुजी यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यानंतर संध्याकाळी ८ च्या दरम्यान ते पन्हाळगडावरील ङ्ग१३ डी थिएटरफ आणि पन्हाळगडाचा रणसंग्राम लघुपटाचा लोकार्पण सोहळा त्यांच्या हस्ते केला जाणार होता.कार्यक्रम स्थळी साप आढळल्याने गोंधळाचे वातावरणया कार्यक्रमासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक शिवप्रेमींनी गर्दी केली होती. देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला पोहोचण्यापूर्वी पन्हाळगडावर काहीसा गोंधळ पाहायला मिळाला. मुख्यमंत्री कार्यक्रमाला पोहोचण्याआधी कार्यक्रम स्थळी साप आढळल्याने एकच खळबळ उडाली. कार्यक्रमस्थळी साप आढळल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या एक सर्प मित्राने हा साप पकडला. त्यानंतर त्याने पकडलेला साप वन विभागातील अधिका-यांकडे सुपूर्द केला. यामुळे मोठा अनर्थ टळला.

# पाणीटंचाईच्या धास्तीने पशुधन बाजारात

चारा व पाणीटंचाईच्या धास्तीने पशुधन बाजारात येत असल्याचे पाचोडच्या आठवडे बाजारात दिसून आले. यावरून दुष्काळी स्थितीचा पहिला फटका पशुधनाला बसतो, असे दिसते. पैठण तालुक्यात पावसाने सरासरी न ओलांडल्याने दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली. यंदा हिवाळ्याच्या प्रारंभीच जलसाठ्यांनी तळ गाठला. बावीस हजार हेक्टरवर लागवड होणारी ज्वारीची पेर निम्म्याने घटली. बहुतांश ठिकाणी ज्वारीचे पीक करपले. मळे फुलविणाऱ्या विहिरींनी तळ गाठल्याने गुरांसाठीच्या हिरव्या चाऱ्याचे उत्पादन थांबले. शेतीलापूरक धंदा पशुपालन व दुग्ध व्यवसायास शेतकऱ्यांची पसंती होती. परंतु, पाण्याअभावी सर्व गणित कोलमडले. घोटभर पाण्यासाठी माणसांसह गुरांना भटकंती करावी लागत आहे. चारा अन् पाणी दुर्लभ झाल्याने पशुपालक पशुधन कमी करण्यावर भर देत आहे. सध्या गुरांची प्रकृती बऱ्यापैकी

पाचोड : बाजारात विक्रीसाठी आलेली जनावरे. (छायाचित्रः कौसर पटेल)

किमती घसरल्या ऐंशी-नव्वद हजारांत विकली जाणारी बैलजोडी आता ५०-६० हजारांवर आली. दुभत्या गायी व म्हशीच्या किमती ४० हजारांपासून एक लाखापर्यंत आहेत. पैठण तालुक्यात मोठी जनावरे ६३ हजार ३८७, लहान १७, ५२३, तर शेळ्या-मेंढ्या ४७,५०३ आहेत. खरीप, रब्बी हंगाम शेतकऱ्यांसह पशुधनाच्या मुळावर उठल्याने पशुधन विकण्याशिवाय पर्यायच नाही, अशी अवस्था आहे.

# पवित्र रमजान महिण्यात मौजे नवगाव येथील लोडशेटींग तात्काळ बंद करा

डॉ.गुलदाद पठाण पैठण तालुका अध्यक्ष राष्ट्र वादी कॉंग्रे स पार्टी (शरदचंद्र पवार) मा.उपकार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय येथील वरिष्ट अधिकार्यांना निवेदन दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,पैठण तालुक्यातील मौजे नवगाव येथे पैठण तालुक्यातील सर्वात जास्त प्रमानात मुस्लिम समाज बांधव राहतो,सध्या मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु आहे.संपुर्ण महाराष्ट्र राज्यात कुठेही लोडशेटींग नसतांना केवळ तालुक्यातील मौजे नवगाव या गावात पहाटे ४:०० ते दुपारी १२:३० पर्यंत दररोज लोडशेटींग केल्या जात आहे.त्यामुळे मुस्लिम समाजातील बांधवांना सकाळी रोजे धरण्यासाठी सकाळी उठावे लागते,व त्याची तयारी करतांना लाईट नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे मुस्लिम समाजात नाराजी पसरलेली असुन पवित्र रमजान महिण्यात मौजे नवगाव येथील लोडशेटींग तात्काळ बंद करुन विजपुरवठा सुरळीत करण्यात यावा या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार ) गटाचे पैठण तालुका अध्यक्ष डॉ.गुलदाद पठाण, सोसायटीचे वाहीस चेअरमन श्री आसिफ पठाण, मौलाना सुभान, हबीब पठाण,यांनी महावितरण विभाग पैठण यांना निवेदन दिले आहे.

# स्वाराती रुग्णालय परिसरातील निवासस्थानांच्या कामाची आ.मुंदडांनी केली पाहणी

स्वामी रामानंद तीर्थ (स्वाराती) रुग्णालय परिसरात वर्ग-३ आणि वर्ग-४ कर्मचाऱ्यांसाठी उभारल्या जात असलेल्या नवीन निवासस्थानांच्या कामाची केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयातील जुन्या आणि जीर्ण झालेल्या निवासस्थानांचे पुनर्बांधणी प्रकल्प आ. नमिता मु ंदडा यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून मंजूर करून आणला आहे. या अंतर्गत १५० कोटी रुपये निधीच्या मदतीने नव्या इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. आ. नमिता मु ंदडा या कामाच्या दर्जावर विशेष लक्ष ठेऊन आहेत. नुकतेच त्यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. आ. मु ंदडा यांनी या बांधकामाची पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांना दर्जेदार काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या नवीन इमारतींचे काम पूर्ण झाल्यानंतर स्वाराती रुग्णालयातील वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील आरोग्य कर्मचाऱ्यांना उत्तम दर्जाची निवासस्थाने उपलब्ध होतील. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा, यासाठी आवश्यक प्रयत्न सुरू असल्याचे आ. मु ंदडा यांनी सांगितल



# भिमशक्ती संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी अक्षय वाघमारे यांची निवड

केज/प्रतिनिधीः-भिमशक्ती संघटनेच्या केज तालुका अध्यक्षपदी अक्षय वाघमारे यांची निवड करण्यात आली असुन या निवडिचे पत्र जिल्हा अध्यक्ष डॉ.आमरेद्र विद्यासागर , यांनी नुकतेच भिमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक प्रा. चंद्रकांत खरात सर,बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख भिमसैन सर, यांच्या हस्ते देण्यात आले या वेळी भिमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते, यावेळी प्रा. चंद्रकांत खरात सर यांनी खा. चंद्रकांत हांडोरे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी संघटना वाढीसाठी कार्य करण्यासाठी अक्षय वाघमारे यांना शुभेच्छा दिल्या

# वारणा डावा कालवा गळती दुरुस्ती कामास प्रारंभ

शिराळा / प्रतिनिधी

कुसळेवाडी ता.शिराळा येथे वारणा डावा कालव्यास गळती लागून मोठ्या प्रमाणात खचला आहे. याठिकाणी आमदार सत्यजित देशमुख यांनी प्रत्यक्ष पांटबंधारे विभागाच्या . अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली.तात्काळ दुरुस्ती चे काम चालू करण्याच्या सूचना यांत्रिक विभागाला दिल्यानंतर लगेच दुपार नंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

कुसळेवाडी ता.शिराळा गावाजवळ असणाऱ्या वारणा डावा कालव्यास गळती लागून खचला.यामुळे शेती पिकांचे व शेतीचे मोठे नुकसान झाले. १९८० साली मातीकाम पूर्ण झालेल्या कालव्यास लिकीज झाले होते. कालवा जिरल्याने मोठी गळती लागली.अचानक कालव्यातून मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने शेजारील शेतीचे व पिकांचे नुकसान झाले



**कुसळेवाडी ता. शिराळा येथे वारणा डावा कालवा खचल्याठिकाणी पांटबंधारे अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करताना आमदार सत्यजित देशमुख.**

आहे.सोडण्यात आलेल्या पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आला आहे. आज प्रत्यक्ष या ठिकाणी जाऊन आमदार सत्यजित देशमुख यांनी पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कालवा दुरुस्तीच्या सूचना दिल्या.त्यानुसार यांत्रिक विभागाने दुरुस्ती चे काम सुरु केले आहे. गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहे.

यावेळी बोलताना आमदार सत्यजित देशमुख म्हणाले :- कालव्यास गळती लागल्यामुळे व पाण्याचा प्रवाह जास्त झाल्याने मातीचा कालवा जिरला आहे. पाण्याच्या गळती मुळे मोठ्या प्रमाणात शेती व पिकांचे चे नुकसान झाले. कालवा दुरुस्ती च्या सूचना यांत्रिक विभागाला दिल्या असून गतीने काम पूर्ण करुन शेतकऱ्यांना पाणी द्यावे असे आवाहन केले.

यावेळी सहाय्यक अभियंता श्रेणी -१ मिलिंद किकवाटकर,सहाय्यक अभियंता श्रेणी -१ अनिल लांडगे, यांत्रिक विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मोरे,सर्जेराव मस्कर, मधुकर कुसळे, उपसरपंच संजय सोडुलकर, बाळू कुसळे, बाबा मस्कर,सुनिल मस्कर,यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी,मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# नळाला नाही पाणी घागर उताणी रे गोपाळा भसबोळन गावात मार्च महिन्यातच पाणी टंचाई मोरगाव अर्जुनी तालुक्यातील ग्रामपंचायत झाशीनगर येथील प्रकार

गोंदिया (सुधीर शिवणकर )

मोरगाव अर्जुनी तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेला भसबोळन गावात मार्च महिन्यात पाणी टंचाईचा सामना नागरिकांना करावा लागतो हा गाव ग्रामपंचायत झाशीनगर अंतर्गत येत असून हा गाव पूर्णतः जंगल परिसरात आहे या गावाला पिण्याच्या पाण्याचे साधन म्हणून गावात दोन बोर आहेत परंतु त्या दोन बोर मार्च महिन्यात पाणी खोल गेल्याने गावातील नागरिकांना पहाटेच्या पाच वाजेपासून पाण्यासाठी भटकंती करावा लागतो येथील असलेले सरपंच ह्या गावात लक्ष देत नसल्याचे आरोप येथील नागरिकांकडून होत आहे सदर प्रतिनिधित्व बोलतानी तेथील



नागरिकांनी सांगितले की सरपंच यांनी म ागील तीन वर्षांपासून गावात आले च नाही ग्रामपंचायत झाशीनगर मध्ये चुटिया, आणी भसबोळन ही दोन गावे या ग्रामपंचायत म ध्ये येत असल्याने येथील सरपंच ग्रामपंचायत पदाधिकारी हे फक्त झाशीनगर गावातच लक्ष देतात ह्या दोन गावात लक्ष देत नसल्याने



येतील नागरिकांनी ग्रापं प्रशासन विरोधात रोष व्यक्त केला आहे.राज्य शासन जल जीवन मिशन अंतर्गत लोकांना शुद्ध पाणी मिळावा यासाठी अनेक उपाययोजना करत असून काही स्थानिक पदाधिकाऱ्यामुळे ह्या योजनेचे तीन तेरा वाजतात. ह्या,गावात नाल्यातील गाळ काढला नसल्याने तेथील नाल्या सुद्धा गाळाने तुडुंब भरलेल्या आहेत.गावात शाळा आहे परंतु शाळेत पिण्याची पाण्याची व्यवस्था नसल्याने मुलांना जेवण झाल्यानंतर पाणी प्यायला घरी यावा लागतो. ही बाब येथील नागरिकांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना सांगितली तरी पण येथील पदाधिकारी जाणीवपूर्व दुर्लक्ष करतात ह्या गावात अंदाजे साठ कुटुंब आहेत आता काही लोकांना घरकुल आल्या आहेत परंतु इकडे प्यायलाच पाणी मिळत नसल्याने घर बांधावे कसे असा प्रश्न येथील घरकुल लाभार्थ्यांना पडला आहे.तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी ग्रामवासी यांनी केली आहे.

# आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा : नुमान चाऊस

माजलगाव : लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय सु ंदरराव सोळंके साहेबांचा मागील ३५ वर्षापासून वसा आणि वारसा चालवणारे माजलगाव मतदार संघाचे पाच वेळेस प्रतिनिधित्व करणारे आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब हे एक अभ्यासू आणि अनुभवी नेतृत्व म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. या मतदारसंघाचे नेतृत्व करत असताना त्यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांना



सोबत घेऊन मतदार संघाचा विकास केला आहे. माजलगाव मतदार संघात आजही सर्व जाती-धर्माचे लोक सुखाने आणि सौख्याने नांदत आहेत यामागे आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब यांचे सुसंस्कृत राजकारण आहे. याआधीही त्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्रीपद सक्षमपणे सांभाळलेले आहे. त्यामुळे त्यांचा अनुभव आणि अभ्यास दांडगा आहे त्यामुळे मंत्रिमंडळात रिक्त झालेल्या जागेवर त्यांचा समावेश करावा अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस व संपूर्ण जिल्हाभरातून होत आहे तसेच बीड जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आमदार सोळंके सारखा संस्कृत पालकमंत्री असावा अशी ही मागणी होत आहे तरी या जनभावनेचा विचार करून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आमदार सोळंके यांना संधी द्यावी.

# घरकूलांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावा आझाद क्रांती सेनेचे निवेदन

दिनांक पाच मार्च २०२५ रोजी माजलगाव गटविकास अधिकारी यांना आझाद क्रांती सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले निवेदनामध्ये असे म्हणण्यात आले की तालूक्यातील गावांना रमाई अवास,पि.एम.व शबरी योजनेचा लाभ दिला जातो, त्या लाभा पासून ९०गावे समस्यानी वेढले आहे.त्यात सांडस चिंचोली,मनूर,मंगरूळ न१/२लवूळ, फूलेपिंपळगाव,पात्रूड अशा असंख्य गावातून बरेच घरकूलचे हप्ते वर्ग झालेले नसून,घराखाललील जागा व अन्य प्रश्न निर्माण झालेले आहेत. पंचायत समिती कार्यालयातून घरकुल मंजूर झालेल्या अर्ध्या लोकांना हप्ते पडतात व बाकी लोकांना हप्ते पडत नसल्यामूळे लोकांची हेळसांड होत आहे घरकुल योजनेतील लाभधारकांना घरकूल मंजूर झाले आहे म्हणून घरे पाडून ठेवली आहेत . घरकुल लाभधारकांचा संसार भर उन्हाळ्यात उघड्यावरती आला आहे पुढील हंगाम हा पावसाचा असल्याने घरकुल लाभधारकांना पावसाळ्याच्या अगोदर घर बांधून पूर्ण होणे ही गरज असतानाही मात्र माजलगाव पंचायत समिती त्याकडे डोळे झाक करत आहे घर पडलेली असल्याने त्या ठिकाणी सर्प,विंचू अशा सरपटणार्या प्राण्या पासून मनूष्य जिव तास धोका होऊ शकतो त्या मूळे आझाद क्रांती सेना प्रमूख राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली गटविकासअधिकारी यांना माजलगावातील संपुर्ण गावाचे हप्ते वर्ग तात्काळ करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे

# महावितरण शिराळा उपविभागामध्ये लाईनमन दिन उत्साहात साजरा..

शिराळा / प्रतिनिधी

राष्ट्रीय लाईन मन दिनाचे औचित्य साधून महावितरण च्या शिराळा उपविभागामध्ये लाईनमन दिन साजरा करण्यात आला. यावेळी इस्लामपूर विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री डामासे साहेब , शिराळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री खटावकर साहेब , सर्व शाखा कार्यालयाचे शाखा अभियंता, जनमित्र व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपविभाग शिराळा अंतर्गत सर्व शाखेचे जनमित्र , यंत्रचालक यांचा ङ्ग शिदोरी सुरक्षेचीङ्घ हि पुस्तिका व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी श्री डामसे व श्री खटावकर यांनी महावितरण चे दैनंदिन काम करत असताना जनमित्र व कर्मचारी यांनी सुरक्षितता बाबतची घ्यावयाची काळजी , ग्राहकांना उत्तम सेवा देऊन आपल्या शिराळा उपविभागाचे नावं उज्वल करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करून सर्वांना लाईनमन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व शाखा अभियंता यांनी आपले मनोगत व्यक्त करून सर्व जनमित्रांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित सर्व वक्त्याने महावितरण मधील या प्रकाशदूताना त्यांच्या कार्यासाठी सलाम केले. जनमित्रांचा ड्रेस हा गणवेश नसून ऊर्जेचा स्त्रोत आहे. कडक उन्हाळा असो किंवा जोरदार पाऊस, वादळीवारा असो,दिवस किंवा रात्र असो, महावितरणचे लाईनमन हे ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर व कर्तव्यदक्ष असतात. शिराळासारख्या



अतिशय दुर्गम डोंगराळ प्रदेशांमध्ये काम करीत असताना अनेक प्रकारचे आव्हाने असताना देखील येथील तांत्रिक कर्मचारी हे ग्राहकांना उत्तम सेवा देण्याकरिता अविरत कष्ट घेत आहेत . प्रसंगी पुराच्या परिस्थितीत देखील आपला स्वतःचा जीव धोक्यात घालून अखंडित वीज पुरवठा ठेवून ग्राहकांना उत्तम प्रकारे सेवा देत आहे. याबद्दल सर्वांनी या जनमीत्रा बद्दल कौतुक व आभार व्यक्त केले.

उपविभागाचे सहाय्यक अभियंता ( गुण नियंत्रक ) श्री ऋषिकेश पाटील यांनी कर्मचा-यांना म हावितरण चे दैनंदिन कामकाज करीत असताना घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी जनमित्र श्री अमर सपाटे यांनी सर्वांनी सुरक्षिततेची शपथ दिली.

यावेळी जनमित्र श्री विजय पाटील मनोज पाटील श्री निखित वाघमोडे , श्री दळवी व इतर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जनमित्र श्री. अमर सपाटे यांनी काव्यात्मक स्वरूपात आजच्या दिवसाचे आपले मनोगत व्यक्त केले व महावितरण कंपनीमध्ये काम करत असताना महावितरणचा कणा व आरसा म्हणून आम्ही फिरत असतो त्याबद्दल आम्हाला त्याचा सार्थ अभिमान आहे असे गौरव उदगार काढले.

शेवटी सर्व जनमित्राने आजच्या लाईनमन दिवसाच्या अनुषंगाने शिराळा उपविभागात शून्य विद्युत अपघात, ग्राहकांना उत्तम सेवा देऊन या मार्चमध्ये सर्वतोपरी प्रयत्न करून आपापल्या शाखा कार्यालयाची थकबाकी निरंक करण्याचे अश्वस्त करून आजचा लाईनमन दिन मोठ्या उत्साहात शिराळा उपविभागामध्ये राबविण्यात आला...

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत विभागीय कार्यालयाचे श्री कुंभार ( मां स ) , उपविभागीय कार्यालयाचे श्री कचरे ( मां स ) , व शेवटी आभार प्रदर्शन जन्मित्र श्री प्रल्हाद कुंभार यांनी केले.

# संतोष देशमुखांच्या हत्येचे फोटो पाहिल्यानंतर लेक पहिल्यांदाच बोलली:, तुम्हालाही अश्रू नाही आवरणार

बीड जिल्ह्याच्या मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यांना अत्यंत क्रूर पद्धतीनं मारण्यात आलं, हे फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट आहे. वडिलांचे फोटो पाहिल्यानंतर पहिल्यांदाच त्यांची मुलगी वैभवी देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे.


नेमकं काय म्हणाल्या वैभवी देशमुख? हे दुःख कधीच संपणार नाही, ते आमच्या घरातील प्रमुख व्यक्ती होते. हे दुःख कधीच आमच्या मनातून जाणार नाही. फोटो बघितल्यानंतर आमच्या कुटुंबाची लढण्याची क्षमता संपून जात आहे, आमची सहनशीलता संपत आहे. दुःख त्या दिवशी सुद्धा तेवढंच होतं आज आणि यापुढेही तेवढेच राहणार आहे. आम्ही आता दुःख सुद्धा व्यक्त करू शकत नाहीत, माझ्या वडिलांना न्याय द्यायचा आहे. हे सगळं कोण घडवून आणतय हा प्रश्न आमच्या समोर सुद्धा आहे. जे फोटो आहेत त्यामध्ये माझ्या वडिलांना अमानुष पद्धतीने मारहाण केली, मृतदेह तुम च्यासमोर असताना तुम्ही हसताय धिंगाणा करताय, त्यांच्यासमोर फोटो काढताय त्याचं आम्हाला किती दुःख आहे. मला माझ्या गावासाठी आणि मुला - मुलींसाठी जगू द्या हे शब्द ऐकल्यानंतर अश्रू अनावर होत आहेत. आज ते घरी येत नाहीत तरी आम्ही त्यांची रात्रीपर्यंत वाट पाहतोय, ते घरी येत नाहीत. आता आम्ही वाट कुणाची बघायची ते घरी येत नाहीत हा प्रश्न आहे. ही घटना खंडणीमुळे झाली आहे, ते लोक इतके अमानुषपणे कृत्य करतात, त्याच्यामागे कोणाचा हात आहे. जी खंडणी जाते ती नेमक कोणासाठी जाते, ती कोणापाशी जाते, हे जे लोक करण्यासाठी आले होते त्यांना कोणी पाठवलं होतं? असा सवाल वैभवी देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,



बारामतीमध्ये जो मोर्चा होतोय त्या मोर्चात कुटुंबीय सहभागी होणार आहे. माझ्या वडिलांना न्याय मिळाला पाहिजे, जे कोणी आरोपी आहेत त्यांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. आमची विनंती एकच आहे लवकरात लवकर न्याय द्या, जे कोणी आरोपी असतील त्यांना कठोरात कठोर शिक्षा द्या, असं वैभवी देशमुख यांनी म्हटलं आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित डान्स स्पर्धा



बीड : महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना व म्हाळसा महिला प्रतिष्ठान यांच्या वतीनं २० मार्च २०२५ रोजी गुरुवारी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एक विशेष डान्स स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. हॉट ेल यशराज, जालना रोड, बीड येथील या स्पर्धेत १२ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुली आणि महिलांना भाग घेण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार तारीख २० मार्च २०२५ वेळ सांयकाळी ५:०० ते ९:०० वाजता स्थळ हॉट ेल यशराज, जालना रोड, बीड बक्षिसे स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या नर्तकांना आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आले आहेत प्रथम बक्षीस ११,००० द्वितीय बक्षीस ७,००० तृतीय बक्षीस ५,००० उत्तेजनार्थ पैठणी साडी नोंदणी प्रक्रिया स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छु कांनी खालील फोन नंबरवर संपर्क साधून आपली नोंदणी करावी फोन नंबर ७३८५४०८९९९ /९०१११ ३०१६७ / ९८२२५१३८७९ आपल्या कतृ ्त्वाचा अस्वाद घेण्यासाठी आपले मनःपूर्वक स्वागत आहे. चला, आपल्या नारीशक्तीला उजाळा द्या आणि या स्पर्धेत भाग घ्या!

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार ७ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## मौजे निमगाव मायंबा लमाणतांडाला महसूली गावात रूपांतर करण्याची अधिसूचना जारी

बीड-प्रतिनिधी शिरूर कासार तालुक्यातील मौजे निमगाव मायंबा अंतर्गत असणाऱ्या लमान वाडी तांडा क्रमांक दोन ला लमान तांडा अधिसूचना रद्द करून महसुली गावात रूपांतरित करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जाहीर केली आहे. याबाबतच्या आदेशात त्यांनी म्हटले आहे की, शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक टीएलसी १०७६/६३९२३/म-६ दि. १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) त्याच्या कलम ४ च्या पोटकलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. त्यांचा वापर करुन मी, अविनाश पाठक, जिल्हाधिकारी बीड मौजे निमगाव मायंबा अंतर्गत अधिसूचना दि. २८ फेब्रुवारी २०११ अन्वये रुपांतरीत करण्यात आलेले लमाणवाडी नं. १ व अधिसूचना दि. ३१.०१.२०२२ अन्वये रुपांतरीत करण्यात आलेले लमाणवाडी तांडा क्र. ०२ अधिसूचना रद्द करत असून याव्दारे दि. ३१.०४.२०२५ पासून बीड जिल्हयाच्या शिरुर कासार तालुक्यातील मौजे निमगांव मायंबा पैकी एकच ङ्गलमाणतांडाफ्ला महसूली गावात रुपांतर करीत आहे. सोबतच्या परिशिष्टामध्ये प्राथमिक स्वरुपात प्रसिध् करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या अधिसूचनेमध्ये नमूद केले आह

# बीडमधील दहशत कधी संपणार की नाही ? बीडमध्ये चाललंय काय !

बीड - (न्यूज नेटवर्क)
बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत अमानुषपणे हत्या करण्यात आली. या हत्येचे व्हिडिओ आणि फोटो समोर आल्यानंतर महाराष्ट्र हादरला आहे. नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता सोशल मीडियावर बीडम धलीच आणखी एक घटना समोर आली आहे. यात काही गुंड एका व्यक्तीला बॅटीने बेदम मारहाण करत असल्याचे दिसून येत आहे. या घटनेमुळे आता बीडमधील दहशत कधी संपणार की नाही, असा सवाल केला जात आहे.

आणखी एका क्रूरतेचा व्हिडिओ बुधवारी व्हायरल झाला. यात एका व्यक्तीला अर्धनग्न करून बॅटने मारहाण केली जात आहे. हा व्हिडिओ बीडमधील शिरूर तालुक्यातील आहे. मारहाण करणारा व्यक्तीचे नाव सतीश भोसले आहे.

सतिश भोसले या गुंडाने काही दिवसांपूर्वी बावी गावातल्या एका व्यक्तीला असेच



मारहाण केली होती अशी माहिती मिळत आहे. या मारहाणीत पीडित व्यक्तीचे सगळे दात पडल्याचे समजते. मात्र, बीडम ध्ये नेमके काय चालू आहे ? असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेला पडला आहे. सतीश भोसले हा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचे सर्व सोशल मिडीयावर सांगितले जात आहे. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सुरेश धस यांनी उत्तर द्यावे, असे आव्हान दिले होते. यावर सुरेश धस यांनी भाष्य केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोशल

### अर्धनग्न करून एकास बॅटने बेदम मारहाण



मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये पांढरा शर्ट घातलेला व्यक्ती हा एका व्यक्तीला बॅटीने बेदम मारहाण करताना दिसते. तसेच एकजण त्या व्यक्तीच्या हाता पायाला धरून असल्याचे दिसते. यावेळी आणखी काही लोक आजूबाजूला असल्याचे समजते. मारहाण करणा-या व्यक्तीचे नाव सतिश भोसले असल्याचे समजते. दरम्यान, पीडित व्यक्तीचे नाव अद्याप समजू शकले नाही. मात्र अत्यंत क्रूरपणे या व्यक्तीला मारहाण केल्याचे दिसून येत आहे.

ङ्गसतीश भोसलेच्या प्रकरणाची माहिती मी घेतली आहे. ती दीड वर्षांपूर्वीची घटना आहे. सतीश भोसलेचे समर्थन मी केलेले नाही. सतीश भोसलेला मी ओळखतो. तो

### कधी-कधी माझ्याकडे येतो - सुरेश धस

सतीश भोसलेला मी ओळखतो. तो कधी-कधी माझ्याकडे येतो, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे. ते विधिमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.



---------

कधी-कधी माझ्याकडे येतो. पाठिमागे असे उद्योग करतो, मला काय माहिती? सतीश भोसलेविरोधात तक्रार दाखल केली, तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे,ङ्ग असे धस यांनी स्पष्ट केले आहे.

-------

# परंडा येथे मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन

परंडा : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घण हत्येच्या निषेधार्थ आणि आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी परंडा शहरात तीव्र आंदोलन करण्यात आले. बहुजन समाज बांधव तसेच विविध राजकीय पदाधिकाऱ्यांनी पक्षांच्या या आंदोलनात सहभाग घेतला. परंडा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात दोन तास रस्ता रोको आंदोलन करून समाज बांधवांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध केला. या घटनेतील सर्व आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, त्यांना मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करून फाशीची शिक्षा द्यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली. तसेच, हत्याकांडात



सहकार्य करणाऱ्यांनाही सहआरोपी करावे, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनाला परंडा शहरातील व्यापारी, सामाजिक संघटना, तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिणामी, परंडा शहर आणि तालुका पूर्णपणे बंद ठेवण्यात आला. किराणा, भाजीपाला, औषधे यांसारख्या अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद होती. आंदोलकांनी परंडातहसीलदार निलेश काकडे यांना निवेदन देऊन आपल्या मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परंडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि अतिरिक्त पोलीस फोर्स तैनात करण्यात आले होते. आंदोलन शांततेत पार पडले, मात्र नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण होते.

## कोरडेवाडीत शुक्रवारपासून कानिफनाथ यात्रोत्सवाला सुरवात

बीड : केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे ग्रामदैवत असलेल्या श्री कानिफनाथ महाराजांचा यात्रोत्सव शुक्रवार (ता. ७ ) पासून सुरू होत आहे. या यात्रोत्सवात येणाऱ्या भाविकांना सुविधांसाठी व यात्रोत्सवाची श्री कानिफनाथ देवस्थान व ग्रामपंचायतीच्या वतीने तयारी पूर्ण झाली आहे. शुक्रवार (ता. ७ ) रोजी कानिफनाथ दर्शन, काठ्यांची मिरवणूक व शोभेची दारू उडवली जाणार आहे. तसेच सायंकाळी आठ वाजता राष्ट्रपती पदक विजेत्या मालती इनामदार यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होणार आहे. दरवर्षी यात्रेपासून दूर असणारे ऊसतोड मजूर या वर्षी साखर कारखाने कमी दिवस चालल्यामुळे आता गावी आले आहेत. त्यामुळे यात्रेमध्ये उत्साहाच वातावरण तयार झाले आहे. दरवर्षी कानिफनाथ देवस्थान समिती अतिशय उत्कृष्ठ नियोजन करत असून याही वर्षी उत्तम प्रकारे नियोजन करण्यात आले आहे. पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या यात्रेच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन यात्रा कमिटी व गावच्या सरपंच सौ. नंदुबाई रमेश कोरडे, उपसरपंच श्री संतोष यादव व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भरउन्हाळ्यात कडक हिवाळा;

बीड । प्रतिनिधी गेल्या काही दिवसांपासून मध्यरात्रीनंतर प्रचंड मोठ्या प्रमाणात थंड पडू लागली आहे. अशा प्रकारे अचानक वातावरण बदलल्याने भर उन्हाळ्यात हिवाळा जाणवू लागला आहे. सध्या इस्लाम धर्मातील पवित्र रमज़ान महिना सुरू असल्याने मुस्लिम समाज रमज़ानचे रो ज़े ठ ेवतो आहे. बदललेल्या या वातावरणात रो ज़्यांवर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता मध्यरात्रीनंतर मात्र वातावरणात मोठा बदल होऊन चक्क हिवाळ्यापेक्षाही जास्त मोठ्या प्रमाणात थंड पडू लागली आहे. पहाटे रमज़ानचा महिना सुरू असल्याने मुस्लिम समाज रमज़ानचे पवित्र रोज़े ठेवत आहे. रोज़ामध्ये शरीरात उष्णता वाढते म्हणून मुस्लिम समाजाचा रो ज़ा सोडताना शरीरातील उष्णतेला कमी करण्यासाठी थंड पेयासह टरबूज, खरबूज यासारखी फळे फ्रिजमध्ये ठेवून ती थंड करून खाण्याकड े कल असतो.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये आता एकच वेळापत्रक: एकाच वेळी होणार वार्षिक परीक्षा

पुणे : एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच वार्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतर शाळा सुरू असल्या तरी विद्यार्थ्यांची उपस्थिती फारशी नसते. याचा विचार करून राज्यातील सर्व शाळांमध्ये एकवाक्यता असावी आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी उपलब्ध वेळेचा पुरेपूर उपयोग व्हावा यासाठी वार्षिक परीक्षा व संकलित चाचणी २, नियतकालिक मूल्यांकन (पीएटी) चाचण्यांचे आयोजन एकाच वेळी केले जाणार आहे. येत्या ८ एप्रिल ते



२५ एप्रिल या कालावधीत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. याबाबतचे परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर करण्यात येत आहे, असे परिपत्रक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी काढले आहे. तसेच राज्यातील सर्व शाळांच्या वार्षिक परीक्षा या एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशा सूचना शिक्षण उपसंचालक (प्रशासन) रजनी रावड े यांनी दिल्या आहेत. राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा साधारणपणे मार्चअखेरीस अथवा एप्रिल महिन्यामध्ये शाळास्तरावरून घेण्यात येतात. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस वार्षिक परीक्षा पूर्ण झाल्यास त्यानंतरच्या कालावधीत शाळा सुरू असल्या तरी विद्यार्थी उपस्थिती पुरेशी असत नाही. अशा पद्धतीने परीक्षांचे आयोजन वर्षअखेर करण्याऐवजी लवकर के ल्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मिळणारा कालावधी कमी होतो. तसेच प्रत्येक शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येते. यासाठी राज्यातील शाळांमध्ये वर्षअखेरीस घेण्यात येणारे मूल्यमापन एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धात करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचण्यांचे (पॅट) आयोजन करण्यात येत आहे.यास अनुसरून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी १ व संकलित मूल्यमापन चाचणी-२ अशा तीन चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# सिरसाळा मंडळातील सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा मंडळ अधिकारी फड व तलाठी ऐरंडे यांचे आवाहन

### फार्मर आयडीचे फायदे :

पी एम किसान योजना लाभ सुलभता,शेतकरी कर्ज वितरण मुलभता,पिक विमा योजना लाभ,पीक हमीभाव खरेदीसाठी मुदत,किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण, महा डीबीटी वरील कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ,नैसर्गीक आपत्ती अंतर्गत पिक नुकसानीचे अनुदान मिळेल,केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजनांसाठी आवश्यक आहे . फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) काढण्याची सुविधा,ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सी.एस.सी. सेंटर ,आपले सरकार सेवा केंद्र व सर्व सेतु कार्यालयात आहे

सिरसाळा : अतुल बडे
परळी तालुक्यातील सिरसाळा महसुल मंडळातील सर्व शेतक-यांनी फार्मर आयडी /ओळ क्रमांक काढावा असे आवाहन सिरसाळा मंडळाचे मंडळ अधिकारी गणेश फड व तलाठी सचिन एरंडे यांनी प्रसिद्धी पत्रका मार्फत केले आहे. फार्मर आयडी चे महत्व सांगितले आहे. सर्व शेतकरी यांनी आपल्या जवळच्या सेतू कार्यालय, ग्राम पंचायत सी.एस.सी. सेंटर व आपले सरकार सेवा केंद्रावर जावून अ‍ॅग्री स्टॅक योजनेअंतर्गत आपला सात बारा आधारला लिंक करावयाचा आहे. जेणेकरुन तुम्हाला एक फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) मिळेल. ज्या द्वारे भविष्यातील केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ तुम्हाला घेता येईल. जर आपण आपला फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) बनवीला नाहीतर आपल्याला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यासाठी जवळच्या महा ई सेवा केंद्रावर जावून पुढील पंधरा दिवसात आपला सातबारा ला आधार लिंक करुन घ्यावे व फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) बनवून घ्यावे व यापूढे भविष्यातील सर्व शेतकरी विषयक




योजनांचा लाभ घ्यावा.राज्यात अ‍ॅग्री स्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच तयार करुन शेतक-यांना त्यांचे ओळख क्रमांक देण्याचाबतचे कामकाज मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे. अ‍ॅग्री स्टॅक म्हणजे शेतकरी व त्यांच्या शेतजमिनीची ओळख पटविणे, शेतक-याने पेरलेल्या पिकाचे नाव आणि क्षेत्र निश्चिती करुन माहितीच्या माध्यमातून शेतकरी कर्ज वितरण सुलभता व कृषी योजनांची कार्यक्षमतापूर्ण अंमलयजावणी करणे होय. म्हटले आहे

### फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) साठी आवश्यक कागदपत्रे :

आधार कार्ड,आधार लिंक मोबाईल क्रमांक,सर्व ७/१२ व ८अ उतारे,(शेतक-याचा मोबाईल क्रमांक आधार कार्डशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे)

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com